# परिपत्रक

**विषय:-** **कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग आरे, गोरेगांव (पूर्व), मुंबई- 400065. या कार्यालयाची सन 2018करिताची नागरिकांची सनद प्रसिध्द करणेबाबत.**

**संदर्भ:-** शासन सा.बां. विभाग पत्र क्र संकिर्ण 2006/ प्र.क्र.185/प्रशासन-3 दि.16/07/2007.

शासकीय कर्मचा -यांचे बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्य पार पाडतांना होणा -या विलंबास प्रतिबंध केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मधील कलम 8 मधील तरतूदीनुसार सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग आरे, गोरेगांव (पूर्व), मुंबई- 400065 या कार्यालयाची सन 2018 करिताची नागरिकांची सनद Citizen Charter तयार करुन याव्दारे प्रसिध्द करण्यात येत आहे.

**(के.एस.शिवदास)**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग आरे,**
**गोरेगांव (पूर्व), मुंबई- 400065.**

**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग आरे,**
**गोरेगांव (पूर्व), मुंबई- 400065.**
**दूरध्वनी क्रमांक : 022 29272447**
**फॅक्स क्रमांक 022 29272447**
**Email:- spaarey.ee@mahapwd.com**
**जा.क्र.साबांविप्रवि-आरे/प्रलि/**
**दि.**

प्रत:- मुख्य अभियंता, विशेष प्रकल्प सा.बां. विभाग मुंबई - 400001 यांना माहितीसाठी सविनय सादर.
सोबत:- नागरिकांची सनद.
प्रत:- अधीक्षक अभियंता, मुंबई बांधकाम मंडळ, चेंबूर, मुंबई- 71 यांना माहितीसाठी सविनय सादर.
सोबत:- नागरिकांची सनद.
प्रत:- कार्यकारी अभियंता, बहुमजली इमारती बांधकाम विभाग कुर्ला, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
सोबत:- नागरिकांची सनद.
प्रत:- कार्यकारी अभियंता, मुंबई रस्ते विकास व संकल्प चित्र क्र. 1 बांद्रा-51 यांना माहितीसाठी अग्रेषित.
सोबत:- नागरिकांची सनद.
प्रत:- कार्यकारी अभियंता, ठाणे खाडीपूल विभाग क्र. 1 कोकण भवन नवीमुंबई यांना अग्रेषित.
सोबत:- नागरिकांची सनद.
प्रत:- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग वरळी, मुंबई- 18 यांना माहितीसाठी अग्रेषित.
सोबत:- नागरिकांची सनद.
प्रत:- कार्यकारी अभियंता, छत्रपती महाराज सा.बां. विभाग कफ परेड, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
सोबत:- नागरिकांची सनद.
प्रत:- कार्यकारी अभियंता,मार्ग विकास क्र.4,अंधेरी,मुंबई-58.यांना माहितीसाठी अग्रेषित.
सोबत:- नागरिकांची सनद.
प्रत:- उप अभियंता कृषी बांधकाम उपविभाग क्र.1 आरे/13 आरे/9 (कालवे)दापचरी/सा.बा.उपविभाग चेंबूरयांना माहितीसाठी रवाना.
सोबत:- नागरिकांची सनद.

## सार्वजनिक बांधकाम विभाग

## महाराष्ट्र शासन

# नागरिकांची सनद

## कार्यकारी अभियंता,

## सार्वजनकि बांधकाम विशेष प्रकल्प विभाग

## आरे, गोरेगांव पूर्व, मुंबई- ४०००६५.

कार्यकारी अभियंता,

सार्वजनकि बांधकाम विशेष प्रकल्प विभाग

आरे, गोरेगांव पूर्व, मुंबई- ४०००६५

ई-मेल spaarey.ee@mahapwd.com

# नागरिकांची सनद

## सन २०१८

## सार्वजनिक बांधकाम विभाग

## महाराष्ट्र शासन

Visit us on www. mahapwd.com

e-mail : spaarey.ee@mahapwd.com

**सुची**


| अ.क्र. | तपशिल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| 1. | प्रस्तावना | 1 |
| 2. | सा.बा.विशेष प्रकल्प विभाग आरे गोरेगाव मुबई-65या कार्यालयाची बांधिलकी व नागरीकांची जबाबदारी | 2 |
| 3. | कार्यालयाची रचना | 2 |
| 4. | विभागीय कार्यालयाचे कार्यक्षेत्र | 2 ते 3 |
| 5. | विभागांतर्गत कार्यपुर्तीचे वेळापत्राक ,माहितीची सुलभता . | 3 |
| 6. | विभागीय क्षेत्रातील रस्ते सुरक्षितता. | 3 |
| 7. | गा-हाण्याचे निराकरण, सनदेचा आढावा, जनसामान्याच्या सूचना. | 4 |
| 8. | नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी . | 4 |
| 9. | परिशिष्ठे अ ब व क | 4 ते 7 |

1. **प्रस्तावना**

हे कार्यालय कृषी बांधकाम विभाग क्र.1 आरे,गोरेगाव,मुंबई 65.या नावाने दि.6/04/1954 पासून कार्यरत आहे,सा.बां विशेष प्रकल्प विभाग आरे गोरेगाव, मुंबई- 65 या नवीन नावाने दि.11/03/2005 पासून कार्यरत आहे .तसेच अधीक्षक अभियंता, मुंबई बांधकाम मंडळ चेंबूर अंतर्गत दि.4/11/2015 पासून कार्यरत आहे. या विभागाअंतर्गत उप अभियंता ,कृषि बांधकाम उपविभाग क्र. 1 आरे, गोरेगांव मुंबई- 65, उप अभियंता, कृषि बांधकाम उपविभाग क्र. 13 आरे, गोरेगांव मुंबई- 65,उप अभियंता, कृषि बांधकाम उपविभाग क्र. 9( कालवे) दापचरी, उप अभियंता, सा.बां. उपविभाग चेंबूर, मुख्यालय कुर्ला-कमानी मुंबई असे चार उप विभाग आहे.

संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली (पूर्व), मुंबई, आरे अंतर्गत रस्ते,आदिवासी पाडे, कुर्झे धरणाचे कामे, गुरांचा बाजार, टांकसाळ मुंबई पाणीपुरवठा इत्यादी कामे करणे या विभागाच्या अखत्यारित येतात. सा.बां विशेष प्रकल्प विभाग आरे ,गोरेगाव, मुंबई- 65 येथे कार्यरत असून हे कार्यालय नागरिकांशी बांधिलिकी जपण्यास कटीबध्द आहे. ही बांधिलकी या सनदेव्दारे हे कार्यालय जाहिर करित असून याची जबाबदारी स्विकारीत आहे. हा विभाग पूढे दिलेल्या सुविधा पुरविण्यास बांधिल आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने निर्धारित केलेल्या व पथदर्शीत केलेल्या सार्वजनिक सेवा तत्परतेने सौजन्यपूर्वक वागणूकीने उपलब्ध व्हाव्यात व नागरिंकाचे सामाजिक प्रश्न सहानूभूतीपूर्वक सोडावावेत हा दृष्टीकोन विचारात घेवून तसेच सर्वसामान्य नागरिकांसाठी ही सनद तयार करण्यात आली आहे.

1. हया विभागाच्या कार्यक्षेत्रांतर्गत संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली (पूर्व), मुंबई, आदिवासी पाडे, धरणाचे कामे, गुरांचा बाजार, टांकसाळ मुंबई ,पाणीपुरवठा इत्यादीची नियतकालिक देखभाल व दुरुस्ती उपलब्ध निधीतून करणे.
2. हया विभागीय का
3. र्यालयात व अखत्यारीतील प्रत्येक कार्यालयात सर्वसामान्य जनतेची गा-हाणी / तक्रारी ऐकणे व त्यांचे निवारण करणे.
4. आपत्कालीन व्यवस्थेसाठी तत्परतेने संबंधित आवश्यक कामे करणे.
5. केंद्र माहितीच्या अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत हया विभागाच्या अखत्यारितील मागितलेली माहिती संबंधीताना विहीत मुदतीत उपलब्ध करुन देणे.
6. कार्यालयाच्या कामकाजात सातत्य ठेवून कार्यपध्दतील आधुनिकीकरण करणे.
7. संगणकीकरणाबाबत हया विभागाच्या अंतर्गत कार्यालयाना अवगत करणे व प्रादेशिक कार्यालय व

मंत्रालय यांना नेटवर्कव्दारे आवश्यक माहिती त्वरीत उपलब्ध होण्यासाठी प्रयत्नशील राहणे.

8. ह्या विभागांतर्गत आवश्यक अद्ययावत विहीत माहिती  तात्काळ सार्वजनिक विभागाच्या www.mahapwd.com या संकेत स्थळावर वेबसाईटवर उपलब्ध करणे व अद्यावत करणे.

9. कार्यालयामध्ये सर्व अभिलेखे अद्यावत करणे व त्याची  वर्गवारी करुन अभिलेख कक्ष नोंदवहीसह अद्यावत करणे.

**10.** नागरिकांच्या सनदेस  व्यापक प्रसिध्दी देणे.

1.

**2 सा.बां विशेष प्रकल्प विभाग आरे गोरेगाव, मुंबई- 65 या कार्यालयाची बांधिलकी व नागरिकांची जबाबदारी.**

**अ) कार्यालयाची बांधिलकी**

वरील सर्व कर्तव्य पार पाडतांना सा.बां विशेष प्रकल्प विभाग आरे गोरेगाव, मुंबई- 65 हे कार्यालय

अ) सेवेच्या गुणवत्तेची बांधिलकी ठेवील.

ब) सौजन्यपूर्ण व आपुलकीची भावना ठेवून कामाचा वेळेत निपटारा करेल.

क) पारदर्शकता व निष्ठा ठेवील यासाठी वेळोवेळी विविध प्रमाणपत्र / ना हरकत प्रमाणपत्र मिळविण्यासाठीची कार्यपध्दती / पत्रके नागरिकांच्या माहितीसाठी उपलब्ध करण्यात येतील.

**ब) नागरिकांची जबाबदारी**

अ) शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचेशी नागरिकांची वर्तणूक सौजन्यपूर्वक असावी.

ब) नागरिकांकडून आवश्यक असलेली माहिती व कागदपत्रे परिपूर्णरित्या मिळावी.

क) नागरिकांच्या प्रतिसाद विकासाला मदत करणारा असावा.

ड) विहीत केलेल्या कालावधीपेक्षा कमी कालावधीत सेवा पुरविण्याचा आग्रह धरु नका

इ) नागरिकांची कायदेशीर तरतूद नियम अभिलिखीत संकेत याचे पालन करावे.

ई) नागरिकांनी सार्वजनिक हित एकात्मता व अखंडता जोपासण्यासाठी सहकार्यची भावना ठेवावी.

**3. सा.बां विशेष प्रकल्प विभाग आरे गोरेगाव, मुंबई- 65 या कार्यालयाची रचना.**

या विभागाअंतर्गत उप अभियंता, कृषि बांधकाम उपविभाग क्र. 1 आरे, गोरेगांव मुंबई- 65, उप अभियंता, कृषि बांधकाम उपविभाग क्र. 13 आरे, गोरेगांव मुंबई- 65, उप अभियंता, कृषि बांधकाम उपविभाग क्र. 9 (कालवे ) दापचरी, उप अभियंता, सा.बां. उपविभाग चेंबूर, मुख्यालय कुर्ला-कमानी मुंबई असे चार उपविभाग येतात .मुख्यालये दर्शविणारा तक्ता **Tree Chart** परिशिष्ठ अ व कार्यकारी अभियंता यांचे क्षेत्राचा नकाशा परिशिष्ठ ब म्हणून जोडला आहे.

शासन स्तरावर विविध धोरणात्मक निर्णय, विभागाचा अर्थसंकल्प, शासकीय इमारती ,अंतर्गत रस्ते, धरण, मुख्य वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली (पूर्व) इ.बाबी देखभाल व दुरुस्तीची कामे मुंबई हाताळल्या जातात.

ह्या विभागातर्गंत कामाच्या अंमलबजावणीसाठी सा.बां. नियमावली 1964 लेखा संहिता 1984 विनिर्देश निर्गमित केलेले शासन निर्णय परिपत्रके इ काटेकोरपणे पालन क्षेत्रीय अधिका-याकडून केले जाते.

**4. विभागीय कार्यालयाचे कार्यक्षेत्र**

या विभागाच्या कार्यक्षेत्रामध्ये उपविभाग क्र. 1 अंतर्गत आरे दुग्धवसाहत, पवई येथील पाणीपुरवठा, प्रशासकीय इमारत,सर्व शासकीय निवासस्थाने,आरे रुग्णालय,न्युझीलंड हॉस्टेल,दुध विज्ञान संस्था,आरे मत्स्यबीज केंद्र,आरे परिसरातील देखभाल व दुरुस्ती ,अंतर्गत रस्ते,निरिक्षण इत्यादी कार्यक्षेत्र आहे. उप अभियंता, कृषि बांधकाम उपविभाग क्र. 13 आरे, गोरेगांव मुंबई- 65 अंतर्गत संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली (पूर्व), मुंबई, येथील सलोह क्रॉकीटची संरक्षक भित बांधणे, मुख्य वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली (पूर्व), मुंबई येथील सिंह विहाराच्या साखळी जाळीचे कामे

2.

करणे, गोरेगांव येथील गुरांचा बाजार स्थलांतर करणे, पशुवैदकिय महाविदयालय गोरेगोव, परेल, जि. कृत्रिम रेतन केंद्र,

पशुवैदकिय दवाखाना भिवंडी, मत्स्यबीज केंद्र, आरे गुणनियंत्रण प्रयोगशाळा येथील देखभाल दुरुस्तीचे कामे आहेत.

उप अभियंता, कृषि बांधकाम उपविभाग क्र. 9 कालवे दापचरी, अंतर्गत दापचरी प्रकल्पासाठी व त्यातील कृषि क्षेत्र धारकांना तसेच शासनाच्या ताब्यातील जमिनीला होणारा पाणीपुरवठा ह्यासाठी विरोळी नदीवर कुर्झे धरण बांधले आहे. यावरील देखभाल व दुरुस्ती करणे, पाणीपुरवठा करणे, उपसाजलसिंचनाव्दारे कृषि क्षेत्र धारकांना पाणीपुरवठा करणे. तसेच दापचरी प्रकल्पा अंतर्गत एकूण 315 निवासस्थाने असून त्याचे एकूण जोते क्षेत्रफळ 22000.00 चौ.मीटर इतके आहे. रस्त्याची एकूण लांबी 38.00 कि.मी असून उपरोक्त कुर्झे धरण, रस्ते, तसेच शासकीय निवासस्थाने यावरील देखभाल व दुरुस्ती इत्यादीसाठी आपतकालीन व अतिमहत्वाची कामे आहेत.व उप अभियंता, सा.बां. उपविभाग चेंबूर, मुख्यालय कुर्ला-कमानी मुंबई यांचे अंतर्गता दिनशा वाच्छा मार्ग मुंबई येथील यशोधन इमारती मागील भूखंड क्र. 186 ते 193 आणि CTS क्र. 1977 वर वाहनतळासहीत निवासस्थाने बांधणे पोलीस स्टेशनच्या इमारतीचे बांधकाम करणे इत्यादी कार्यक्षेत्र येतात.

**५. विभागाअंतर्गत कार्यपूर्तीचे वेळापत्रक माहितीची सुलभता**

**अ कार्यपूर्तीचे वेळापत्रक**

सा.बां. विशेष प्रकल्प विभाग आरे, गोरेगांव पूर्व, मुंबई- ६५ या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील विविध ना हरकत

प्रमाणपत्रä मिळविण्यासाठी लागणारा कालावधी त्यास सक्षम अधिकारी इत्यादीची माहिती तसेच या विभागांतर्गत करण्यात येणा-या कामाविषयीची माहिती कार्यपूर्तीचे वेळापत्रक परिशिष्ठ क मध्ये नमुद केली आहे.

अर्जाचा विहित नमुना व जोडावयाची आवश्यक कागदपत्रे यांची माहिती विहीत फी भरुन संबंधित विभागीय कार्यालयात मिळू शकते.

नैसर्गिक आपत्ती कायदा व सुव्यस्थेचा प्रश्न इत्यादी बाबी उदभवल्यास या वेळापत्रकातील कार्यपूर्तीच्या कालावधीत वाढ होऊ शकते.

**ब माहितीची सुलभता**

सार्वजनिक विभागाच्या www.mahapwd.com या संकेत स्थळावरुन तसेच वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या परिपत्रकाव्दारे जनतेला आकडेवारीचा तपशिल सुलभतेने उपलब्ध हाईल.

**६ विभागीय क्षेत्रातील रस्ते सुरक्षितता**

सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्यांची सुरक्षितता वाढविण्यासाठी अपघात निवारण समिती स्थापन केली आहे ही समिती प्रत्यक्ष पाहणी करुन अपघात प्रवण स्थळ शोधून अशा स्थळाची सुधारणा करण्यासाठी उपाययोजना सूचविते. या विभागाअंतर्गत असलेल्या आरे मधील अंतर्गत रस्त्याची देखभाल व दुरुस्ती केली जाते जेणेकरुन आरे वसाहतीतील नागरिकांना प्रवास साईस्कररित्या करणे शक्य होईल.



**७ गा-हाण्याचे निराकरण सनदेचा आढावा व जनसामान्याच्या सूचना.**

**अ गा-हाणी / तक्रारी याचे निराकरण.**

विभागाबाबत अथवा कामाबाबत तक्रारी असतील तर त्यासाठी नागरिंकांनी ज्या विशिष्ट कार्यालया विरुध्द गा-हाणे / तक्रारी असतील त्या कार्यालयाच्या वरिष्ठ कार्यालय , कार्यालयाविरुध्द गा-हाणे / तक्रारी असल्यास विभागीय कार्यालय प्रमुखाकडे म्हणजे कार्यकारी अभियंता यांचेकडे गा-हाणे मांडावे, तक्रार नोंदवावी .विभाग कार्यालयाविरुध्द गा-हाणे / तक्रारी असल्यास मंडळ कार्यालयाच्या अधीक्षक अभियंता कार्यालयाकडे गा-हाणे / तक्रार नोंदवावी. अशा गा-हाणी / तक्रारी निवारण या कार्यालयाकडून ७ दिवसांत करण्यांत येईल. गा-हाणी / तक्रारी नोंदविण्यासाठी प्रत्येक कार्यालयात स्वतंत्र तक्रारपेटी ठेवण्यात येत आहे. गा-हाणी समक्ष भेट / पत्राने वा इ मेलव्दारे नागरिक मांडू शकतात.

**ब नागरिकांच्या सनदेचा आढावा / सिंहावलोकन**

हया विभागाच्या नागरिकांच्या सनदेच्या उपयुक्ततेबाबत तथा परिणामकारकतेचा आढावा सा.बां. विशेष प्रकल्प विभाग आरे, गोरेगांव पूर्व, मुंबई- ६५ अंतर्गत घेण्यात येईल व त्याचा अहवाल प्रसिध्द करण्यात येईल.

**क जन सामान्यांकडून सूचना**

हया विभागाची ही नागरिकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय

नागरिकांच्या बहुमुल्य सूचनांचा गांभिर्यपूर्वक विचार करुन त्यात केलेली सूधारणा घडवून आणता येईल. ही नागरिकांची सनद स्वतहून काही नविन कायदेशीर हक्क निर्माण  करीत नाही. ती सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सेवा उपभोगणा-या नागरिकांना जादा हक्क मांडण्यासाठी मदत करते.

**८ नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी**

सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत हया विभागाच्या नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी दि.१५/८/२००५ पासून करण्यास विभाग कटीबध्द आहे.

सनदेस व्यापक प्रसिध्द देवून नागरिकांच्या प्रतिक्रिया / अभिप्राय मागविण्यात येतील व त्यांच्या सूचनांचा **यथोचित** आदर करुन आवश्यक बदल करण्यात येतील. नागरिकांना सौजन्यपूर्ण व मदत करण्याच्या भावनेने वर्तणूक मिळेल, भ्रष्ट्राचारास आळा घालवण्यात येईल तसेच नागरिकांच्या गा-हाण्याचे निराकरण करण्यांत येईल.

**९ परिशिष्ठे**

अ मुख्यालय दर्शविणारा वृक्ष तक्ता Tree Chart

ब कार्यक्षेत्राचा नकाशा

क कार्यपूर्तीचे वेळापत्रक

## परिशिष्ट - अ

## मुख्यालय दर्शविणारा वृक्ष तक्ता Tree Chart

कार्यकारी अभियंता

सा.बां. विशेष प्रकल्प विभाग आरे,

गोरेगांव पूर्व, मुंबई- ६५

उप कार्यकारी अभियंता

सा.बां. विशेष प्रकल्प विभाग आरे,

गोरेगांव पूर्व, मुंबई- ६५

उप अभियंता
कृषि बांधकाम
उपविभाग क्र. 1
आरे, गोरेगांव मुंबई-
65,

उप अभियंता
कृषि बांधकाम उपविभाग क्र.
13 आरे, गोरेगांव मुंबई-
65

उप अभियंता
कृषि बांधकाम उपविभाग
क्र. 9( कालवे) दापचरी

उप अभियंता,
सा.बां. उपविभाग चेंबूर,
मुख्यालय कुर्ला-कमानी
मुंबई

5.

# परिशिष्ठ क

# कार्यपूर्तीचे वेळापत्रक

| अक्र | कार्यसूची क्र | कार्यवाही करणारा सक्षम अधिकारी | कार्यपूर्तीचा कालावधीमर्यादा |
|---|---|---|---|
| 1. | रस्ता ओलांडून जाणा-या वाहिन्यांसाठी व रस्त्यांच्या बाजूला टाकण्यात येणा-या वाहिन्यांबाबत ना हरकत प्रमाणपत्र | शासन / मुख्य अभियंता /अधीक्षक अभियंता | १५ दिवसात वरिष्ठ कार्यालयास सादर करणे. |
| 2. | रस्त्याच्या बाजूला जाहिरात फलक लावणेबाबत नाहरकत प्रमाणपत्र देणे | शासन | १५ दिवसात वरिष्ठ कार्यालयास सादर करणे. |
| 3 | रस्ता ओलांडून जाणा-या वाहिन्यांसाठी व रस्त्यांच्या बाजूला टाकण्यात येणा-या वाहिन्यांचे रास्त भाडे प्रमाण भाडे . | कार्यकारी अभियंता | १५ दिवस |
| 4. | अंदाजपत्रके तयार करणे | कार्यकारी अभियंता / उप अभियंता | १५ दिवस |
| 5. | अंदाजपत्रकांना मंजूरी देणे | मुख्य अभियंता /अधीक्षक अभियंता / कार्यकारी अभियंता | वित्तीय अधिकारानुसार सक्षम अधिकारी मान्यता १५ ते ६० दिवस |
| 6. | निविदा बोलविणे व निविदा निश्चित करणे. | मुख्य अभियंता /अधीक्षक अभियंता / कार्यकारी अभियंता | वित्तीय अधिकारानुसार सक्षम अधिकारी मान्यता १५ ते ६० दिवस |
| 7. | कंत्राटदारांची देयके अदा करणे. | कार्यकारी अभियंता | कामे प्रगती पथावर असतांना / पूर्ण झाल्यानंतर उपलब्ध अनुदानानुसार देयके अदा करणे. |